राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमांअंर्तगत राज्यात
कांदाचाळी उभारणीसाठी अनुदान देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक : सपस १००९/ प्र. क्र.७९ /२४स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : २१ जुलै, २००९.

वाचा :- अवर सचिव, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक राकृवि -१००९/ प्रक्र १९ / राकृवियो कक्ष
दिनांक २९ जून,२००९.

प्रस्तावना :- राज्यात कांदा पिकाचे पुरेसे उत्पादन होऊनही अपुरी साठवणुक क्षमता असल्याने कांद्याच्या भावात घसरण होवून शेतक-यांना योग्य भाव मिळत नाही. शास्त्रोक्त पध्दतीने कांदाचाळी बांधल्यास कांद्याची नासाडी कमी होऊन ग्राहकांना चांगल्या प्रतीचा कांदा वर्षभर उपलब्ध होवुन शेतक-यांनाही चांगले दर प्राप्त होवु शकतात. राज्यात अंदाजे ८ लाख मे. टन क्षमतेच्या कांदाचाळी उभारणे आवश्यक असुन आतापर्यंत अंदाजे ४ लाख मे. टन क्षमतेच्या कांदाचाळींची उभारणी करण्यात आली आहे. येत्या वर्षभरात अतिरीक्त १ लाख मे. टन क्षमतेच्या कांदाचाळी उभारणीचे उद्दिष्ट आहे . राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राज्यात कांदाचाळी उभारणीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार कांदाचाळ बांधकाम खर्च रु.६ हजार प्रती मे. टन इतका निर्धारित करण्यात आला असुन शेतक-यांना रुपये १५०० प्र. मे. टन इतके अनुदान द्यावयाचे आहे . सदर योजनेकरीता रु.१५.३० कोटी इतके अनुदान राज्यस्तरीय मंजूरी समितीने मंजुर केले असल्याचे कृषी विभागाने त्यांच्या संदर्भाधिन दिनांक २९ जून,२००९ च्या पत्राने कळविले आहे. ही योजना राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना विहीत करण्याची बाब शासनाच्या विचारधिन होती .

शासन निर्णय :- राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत कांदा चाळी उभारणी प्रकल्प महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेसाठी प्राप्त होणारा निधी राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार खर्च करण्यात यावा. योजनेची अंमलबजावणी करताना नव्याने कर्मचारी नियुक्त करु नये तसेच वाहन खरेदी करण्यात येवू नये. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी, संनियंत्रण, मुल्यमापन करणे तसेच विहित लेखा पध्दतीनुसार आर्थिक लेखे ठेवण्याची कार्यवाही कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, म. रा. पुणे यांनी करावी. सदर योजना राबवित असताना वेळोवेळी प्रगती अहवाल शासनास सादर करावे. तसेच लाभार्थींना अनुदानाचे वितरण करण्यात आल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र विहित वेळेत शासनास सादर करण्यात यावे.

२. या योजनेकरीता लागणारा निधी कृषि विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर कृषी पणन मंडळ, म.रा.पुणे यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. योजनेचा कालावधी हा शासन निर्णय निर्गमीत झाल्यापासून धरण्यात येईल.

३. सदर प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करुन शेतक-यांना त्वरीत अनुदान देण्यासाठी अंमलबजावणी विषयक सुधारित सविस्तर मार्गदर्शक सूचना सोबतच्या सहपत्राव्दारे जोडल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

( आ. अ. माळी )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रती,

१. अपर मुख्य सचिव (नियोजन ), मंत्रालय, मुंबई -३२.
२. प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय , मुंबई -३२.
३. प्र. सचिव (सहकार व पणन ), मंत्रालय, मुंबई -३२मंत्रालय, मुंबई -३२.
४. सचिव ( जलसंधारण ) ग्रामविकास व जलसंधारण मंत्रालय, मुंबई -३२.
५. सचिव (पदुम ) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.

६. आयुक्त कृषि ,कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे.
७. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था म.रा. पुणे.
८. कृषि पणन संचालक, म.रा. पुणे.
९. कार्यकारी संचालक, म.रा. कृषि पणन मंडळ, गुलटेकडी मार्केटयार्ड पुणे.
१०. व्यवस्थापकीय संचालक, म.रा. छोट्या शेतक-यांचा कृषि व्यापार संघ पुणे.
११. सर्व विभागीय कृषि सहसंचालक /सर्व जिल्हा आधिक्षक, कृषि अधिकारी.
१२. सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था.
१३. सर्व तालुका उप निबंधक, सहकारी संस्था.

-----------------------------------------

शासन निर्णय : सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक सपस १००९/प्रक्र ७९/ २४ स, दिनांक २१ जुलै,२००९ चे सहपत्र
राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राज्यात कांदा पिकाच्या साठवणुकीसाठी कांदाचाळी उभारण्याबाबतचा प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना सन २००९-१०.

---

कांदाचाळ अनुदान योजनेचे निकष खालीलप्रमाणे निर्धारीत करण्यात येत आहेत.

(१) योजनेचे पात्र लाभार्थी -

(अ) कांदाउत्पादक वैयक्तिक शेतकरी

१. राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी की, ज्यांच्या नावे स्वतःच्या मालकीची जमिन असुन त्यांची ७/१२ उता-यामध्ये कांदा लागवडीखालील क्षेत्र नमुद आहे.

२. राज्यातील ज्या शेतक-यांनी यापुर्वी कांदाचाळ अनुदानाचा लाभ घेतलेला नाही व ज्यांचे कांदालागवडी खालील क्षेत्र कमीत कमी १० आर ते १ हेक्टर पर्यंत आहे असे शेतकरी ५ मे.टन ते ५० मे.टन पर्यंतच्या विहित नमुन्यातील कांदाचाळी एकाच टप्यात नव्याने उभारण्यास पात्र राहतील.

३. ज्या कादा उत्पादक शेतक-यांचे कांदा लागवडीखालील क्षेत्र एक हेक्टर पेक्षा जास्त आहे व यापुर्वीच्या अनुदान योजनेचा लाभा घेतलेला नाही असे शेतकरी एकाच टप्यात नव्याने १०० मे.टन क्षमतेपर्यंत कांदाचाळी उभारण्यास पात्र राहतील.

४. एका कुटुंबास एकाच कांदाचाळीस अनुदान हे सुत्र या योजनेबाबत अंमलात आणण्यात येत आहे. त्यामुळे यापुर्वी ज्या कुटुंबात उदा. पती, पत्नी , किंवा १८ वर्षा खालील लाभार्थीचे मुले यापैकी एकास यापुर्वी कृषि विभाग किंवा पणन मंडळाच्या योजनेतुन अनुदानाचा लाभ दिलेला आहे. अशा व्यक्तींनी या योजनेतुन अनुदानासाठी पुन्हा नव्या कांदाचाळीचे प्रस्ताव नव्याने सादर करु नये. याबाबत शासनाची दिशा भूल करण्याचा प्रयत्न केल्यास तो दखल पात्र गुन्हा ग्राहय धरुन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. कुटुंबातील एकाच व्यक्तीला म्हणजे पती किंवा पत्नी किंवा १८ वर्षा खालील लाभार्थीचे मुले यांपैकी केवळ एकालाच अनुदान देय राहील.

(ब) कृषि क्षेत्राशी निगडीत इतर लाभार्थी सहकारी संस्था -

१. ज्या संस्था शेतकरी व शेती व्यवसाय या क्षेत्राशी निगडीत आहेत, अशा संस्था या योजनेअंतर्गत कांदाचाळी उभारु शकतील. यामध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्या / विविध कार्यकारी संस्था /खरेदी विक्री संघ/ कांदा उत्पादकांच्या सहकारी संस्था / शेतकरी बचत गटाच्या सहकारी संस्था इत्यादी संस्थाचा योजनेत समावेश करण्यात येत आहे.

२. वरील सहकारी संस्था २५ मे. टन ते जास्तीत जास्त ५०० मे टन क्षमतेच्या कांदाचाळ प्रकल्प या योजनेतून उभारु शकतात.

३. पतपेढ्या व वित्तीय सहकारी संस्थांना या योजनेतुन अनुदानाचा लाभ देता येणार नाही.

(२) योजनेचा अंमलबजावणी कालावधी -

१. योजनेचा कालावधी दि.१ एप्रिल २००९ ते दि. ३१ मार्च २०१० असा राहील.

२. या कालावधीत जे शेतकरी / सहकारी संस्था पणन मंडळाने निर्धारीत केलेल्या आराखड्याप्रमाणे ५,१०,१५,२०,२५, व ५० मे टन क्षमतेच्या कांदाचाळी उभारतील व योजनेचे विहीत मापदंड पुर्ण करुन व बांधकाम पुर्ण झाल्यानंतर अनुदानासाठी परीपुर्ण प्रस्ताव विहित कालावधीत सादर करतील असे लाभार्थी या योजनेसाठी पात्र राहतील.

३. ज्या कांदाचाळीचे बांधकाम फेब्रु ०९ व मार्च ०९ मध्ये पुर्ण झालेले असुन संबंधित नविन कांदाचाळीचे प्रस्ताव सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात यापुर्वी रितसर दाखल झालेले आहेत. असे सर्व नविन चाळींचे प्रस्ताव संबंधित सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी लाभार्थीचे नाव, आवक नं व दिनांक इत्यादी माहीती पत्रा सोबत एकत्रीत पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे तपासणीसाठी वर्ग करावेत. अशा प्रस्तावांची तपासणी पणन मंडळाचे प्रतीनिधी करतील.

४. सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्या स्तरावर असलेले जुन्या कांदाचाळीचे किंवा कृषि विभागाकडील प्राप्त प्रलंबित जुन्या प्रस्तावांना या योनेतुन अनुदान देय होणार नाही असे प्रस्ताव अनुदानासाठी वर्ग करु नयेत,ते संबंधितांना परत करावेत अशा चाळींची यापुढे तपासणी करण्यात येणार नाही.

(३) कांदाचाळीचे विहीत आराखडे -

१. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे व राष्ट्रीय कांदा लसुन संशोधन केंद्र, राजगुरुनगर, पुणे यांनी विहीत केलेल्या ५,१०,१५,२०,२५ व ५० मे. टन क्षमतेच्या कांदाचाळी ठरलेल्या मापदंडाप्रमाणे बांधकाम पुर्ण करणे अनुदानासाठी बंधनकारक आहे व अशा पुर्ण झालेल्या कांदाचाळी अनुदानासाठी पात्र राहतील.

२. अनुदानासाठी एक पाखी फक्त ५ मे. टन व १० मे.टन क्षमतेच्या कांदाचाळ अनुदानासाठी पात्र राहील. एक पाखी कांदाचाळीची लांबी निर्धारीत १० मे. टन क्षमतेपेक्षा जास्त असल्यास देय अनुदान फक्त १० मे.टन पर्यंतच मर्यादित राहील. अतिरिक्त लांबी अनुदानासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

३. दुपाखी कांदाचाळ १५,२०,२५ व ५० मे.टन क्षमतेच्या अनुदानासाठी पात्र राहतील. अशा दुपाखी कांदाचाळीची एका कप्याची रुंदी फक्त चार फुट ठेवावी.जास्त रुंदी असलेल्या कांदाचाळी अनुदानासाठी ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

४. कांदाचाळीचे आराखडे व योजने बद्दल संपुर्ण माहीती पणन मंडळाचे मुख्यालय, विभागीय कार्यालये, व स्थानिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयातुन शेतकरी प्राप्त करु शकतात.

४) <u>अनुदान दर व अनुदान मर्यादा -</u>

१. शास्त्रोक्त पद्धतीने कांदाचाळ उभारणीचा खर्च जास्तीतजास्त रु.६०००/-प्रती मे.टन ऐवढा निर्धारीत करण्यात येत आहे. अनुदान हे रु.१५००/- प्रती मे.टन किंवा बांधकाम खर्चाच्या २५ % यापैकी जे कमी असेल ते लाभार्थीस देय राहील.

२. वैयक्तीक शेतक-यांना जास्तीतजास्त १०० मे.टन क्षमतेच्या कांदाचाळीसाठी रु.१,५०,०००/- तर सहकारी संस्थांना जास्तीतजास्त ५०० मे.टन क्षमतेच्या कांदाचाळीसाठी रु.७,५०,०००/- ऐवढे अनुदान देण्यात येईल.

५) <u>वैयक्तीक शेतक-यांसाठी कांदाचाळ अनुदान अर्जाची उपलब्धता व अर्ज स्विकृती कार्यप्रणाली</u>

(अ) अर्जाची उपलब्धता

१. कांदाचाळ अनुदानासाठी लागणारे विहीत नमुन्यातील अर्ज व योजनेबाबत संपुर्ण माहीती कांदाचाळ उभारणी करण्यापुर्वी शेतक-यांना देण्यासाठी बाजार समिती व्यवस्थापनाने या कामासाठी एका कर्मचा-याकडे अतिरीक्त जबाबदारी सोपवावी.

२. संबंधित कर्मचा-यांनी शेतक-यांना कांदाचाळ कशी उभारावी व अनुदानासाठी प्रस्ताव कसा दाखल करावा याबाबत संपुर्ण माहीती द्यावी. तथापी या कामासाठी बाजार समितींनी या कामासाठी नव्याने कर्मचारी नियुक्त करु नये. शेतक-यांच्या आवश्यकतेनुसार संबंधीत कर्मचा-यांनी बांधकामाच्या ठिकाणी भेट देवुन मार्गदर्शन करावे. शेतक-यांना कांदाचाळ प्रस्ताव तयार करण्यास मदत करावी.

३. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा मार्फत बाजार समितीला कांदाचाळ अनुदान नमुना प्रस्ताव देण्यात येईल.

४. नमुना प्रस्तावा प्रमाणे बाजार समितीने बाजार समितीचे नाव, पत्ता व अर्ज क्र. इ. माहीतीसह अर्ज छपाई करुन शेतक-यांना उपलब्ध करुन द्यावा. यासाठी सेवाशुल्क रु.१००/- ऐवढी रक्कम प्रती लाभार्थीला प्रती अर्ज आकारणी करुन अधिकृत पावती देवुन बाजार समितीमध्ये रक्कम स्वतंत्र खाती जमा करावी.

५. अर्जाच्या मुख पृष्ठावर पावती क्र. व बाजार समितीचा शिक्का व सही करुन लाभार्थीला अर्ज द्यावा. त्याची नोंद बाजार समिती स्तरावर स्वतंत्र रजिस्टर ठेवून करावी. व बाजार समितीने दिलेल्या अधिकृत अर्जात शेतक-या कडून प्रस्ताव स्विकृत करावा.

६. या योजनेचा व्यापक प्रमाणात बाजार समितीने प्रचार व प्रसार करावा.

७. बाजार समितीने शेतक-यांसाठी व्यापक प्रमाणात कांदाचाळ प्रशिक्षण कार्यक्रम / सभा आयोजित करुन या योजनेबाबत शेतक-यांना माहिती द्यावी.

(ब) अर्ज स्विकृती-

१. शेतक-यांकडुन कांदाचाळीचे बांधकाम पुर्ण झालेले व योजनेचे मापदंड पुर्ण होत असल्यास बाजार समितीकडुन शेतक-यांना उपलब्ध करण्यात आलेल्या अधिकृत अर्जात सर्व मुळ कागदपत्रासह फक्त एका प्रतीत प्रस्ताव बाजार समितीने स्विकृत करावा.

२. प्रस्ताव दाखल करणा-या शेतक-याला यापुर्वी अनुदानाचा लाभ देण्यात आलेला नसल्याबाबत खात्री करावी. तसेच १ एप्रिल २००९ नंतर नव्याने बाधकाम झालेल्या व कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीला यापुर्वी अनुदानाचा लाभ देण्यात न आल्याची खात्री केल्यानंतरच कांदाचाळ धारक शेतक-याकडुन अर्ज स्विकृत करावा.

३. प्राप्त प्रस्तावाची आवक रजिस्टर मध्ये नोंद करावी.

४. कृषि उत्पन्न बाजार समिती कडून शेतक-यांना चुकीची माहिती देणे / चुकीचे अर्ज स्विकारुन शासनाची दिशा भूल करणे, शेतक-यांकडुन कर्मचा-यांनी या कामासाठी पैशाची मागणी करणे, अशा प्रकारे तक्रारी उद्भवल्यास व कामकाजात अनियमता आढळल्यास किंवा चुकीचे प्रस्ताव स्विकारल्यास यास संबंधीत सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. योजनेच्या अंमलबजावणी बाबत पुर्णतः पारदर्शकता राहील याची दक्षता बाजार समितीने घ्यावी.

६. या अनुदान योजनेचा उद्देश हा कांदा उत्पादक शेतक-यांच्या स्तरावर इंन्फ्रास्ट्रक्चर निर्मितीला चालना देणे असा आहे. कारण पूर्वी कृषि उत्पन्न बाजार समिती कायद्यामध्ये नियमन या संकल्पनेवर भर होता. आता पणन व्यवस्थेसाठी विकासाभिमुख कार्यवाही बाजार समितीकडुन या योजनेची अंमलबजावणी करताना अपेक्षीत आहे.नव्याने बाजार समिती कायद्याच्या नावात "नियमन" व "विकास" या दोन्ही शब्दांचा समावेश आहे. त्यामुळे संबंधीत कामाची जबाबदारी बाजार समितीवर सोपविण्यात येत आहे.

<u>क) प्रस्ताव स्विकारताना प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे असल्याची खात्री करावी.</u>

१) अर्जासोबत शेतक-यांच्या नावे कांदा लागवड व नव्याने बांधलेल्या कांदाचाळीची नोंद असलेला ७/१२ उतारा.

२) अर्जासोबत ८ अ उतारा जोडावा.

३) वित्तिय संस्थाकडुन कर्ज घेतले असल्यास कर्ज मंजुरी बाबत बँक आदेश पत्र.

४) अर्जासोबत दोन फोटो लावावे. (अ) शेतक-यांचा कांदाचाळीसह (ब) टीन पत्रावरील नामफलकाचा कांदाचाळीसह फोटो.

५) अर्जासोबत खर्चाची मुळ बिले व एकुण खर्चाचा गोषवारा जोडावा.

६) दोन साक्षीदारांसह हमीपत्र रु. २० चा स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले जोडावे.

७) कृषि विभागाचा अनुदान न मिळाल्याबाबतचा दाखला.

८) लाभार्थिच्या नावाचा उल्लेख असलेल्या शिधापत्रीकेची झेरॉक्स प्रत .

९) प्रस्ताव फक्त एकाच प्रतीत स्विकृत करावा. शेतक-याला प्रस्ताव स्विकृतीबाबत पोहोच पावती द्यावी. झेरॉक्स प्रतीत असलेले प्रस्ताव स्विकारु नये.

अशा रितीने बाजार समिती स्तरावर अनुदानासाठी प्राप्त झालेले परिपूर्ण प्रस्ताव व त्याची यादी उदा. शेतक-यांचे नाव, संपूर्ण पत्ता, दुरध्वनी क्र. व कांदाचाळ क्षमता या माहितीसह लेखी स्वरुपात सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती हे पणन मंडळाच्या संबंधीत विभागीय कार्यालयास दर आठवड्याला पत्रासह वर्ग करतील.

विभागीय व्यवस्थापक, पणन मंडळ हे प्राप्त यादीनुसार कांदाचाळ तपासणीसाठी पणन मंडळाचे प्रतिनिधी नियुक्त करतील. योजनेच्या अंमलबजावणी बाबत बाजार समिती स्तरावर अनियमितता आढळल्यास किंवा शेतक-याकडुन तक्रारी प्राप्त झाल्यास अशा बाजार समिती कडून कामकाज काढुन दुस-या बाजार समितीकडे सोपविण्याचे अधिकार संबंधीत जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था यांना प्रदान करण्यात येत आहेत.

६) कांदाचाळीची तपासणी व अनुदानासाठी प्रस्ताव सादर करणे.

योजनेच्या अंमलबजावणीत सुसूत्रता यावी व प्राप्त प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही करणे यासाठी कांदाचाळ तपासणीसाठी फक्त एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात येत आहे. यापूर्वी २५ जून २००८ च्या शासन निर्णयानुसार काढण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार गठीत करण्यात आलेल्या तालुका व जिल्हा स्तरीय समित्या या निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे. पणन मंडळाचे अधिकारी / कर्मचारी किंवा पणन मंडळाने प्राधिकृत केलेले प्रतिनीधी कांदाचाळीची तपासणी करतील. संबंधीत अधिकारी / कर्मचारी कांदाचाळीची मोका तपासणी करुन त्या बाबत विहीत नमुन्यातील तपासणी अहवाल स्वहस्ताक्षरांत भरुन अनुदान रकमेची शिफारस व स्वाक्षरीसह प्रस्तावासोबत विभागीय व्यवस्थापक पणन मंडळ यांना सादर करतील.

अ) कांदाचाळ तपासणी अधिका-यांनी कांदाचाळ तपासणी करताना खालील बाबींची दक्षता घ्यावी.

१. दि. १ एप्रिल २००९ नंतर नव्याने बांधकाम झालेल्या व कुटुंबातील कोणत्याही व्यक्तिला यापूर्वी अनुदानाचा लाभ देण्यात न आल्याची खात्री केल्यानंतरच कांदाचाळ धारक शेतक-यांच्या कांदाचाळीची तपासणी करावी.
२. दि. १ एप्रिल २००९ पूर्वी जे नवीन कांदाचाळीचे प्रस्ताव तालुका सहाय्यक निबंधक यांच्या स्तरावर प्राप्त झालेले आहेत व मोका तपासणीचे काम अपूर्ण आहे अशा कांदाचाळींच्या तपासणीचे काम एक सदस्यीय समितीने करावे. जुन्या कांदाचाळींचे प्रस्ताव तपासू नयेत.
३. कांदाचाळीची तपासणी करताना प्रस्तावासोबत सादर केलेली माहिती / कागदपत्रांची सत्यता दर्शक स्थितीची खात्री केल्यानंतरच प्रस्ताव तपासणीसाठी स्विकृत करावा. बांधकामात त्रुटी असणे, अपूर्ण असणे किंवा प्रस्तावातील त्रुटींबाबत तपासणी अधिका-यांनी लेखी स्वरुपात त्रुटींची पूर्तता करण्याबाबत लाभार्थीला कळवावे. त्रुटीची पूर्तता झाल्यानंतरच कांदाचाळीची तपासणी करावी.
४. कृषि विभाग व पणन मंडळाने यापूर्वी लाभार्थीला अनुदान न दिल्याबाबत खात्री करावी.
५. कांदाचाळीचे आकारमाने, त्या आधारे कांदाचाळीची क्षमता व अनुदानाचा दर किंवा बांधकाम खर्च यानुसार देय रक्कम यापैकी जी कमी असेल त्यानुसार अनुदान प्रस्तावीत करावे. लाभार्थीला नियमबाह्य अनुदान प्रस्तावित केले जाणार नाही याची खात्री तपासणी अधिकारी / कर्मचारी यांनी करावी. जर नियमबाह्य अनुदान प्रस्तावित केल्यास व त्याचा लाभ लाभार्थिला दिला गेल्यास ते वसुल करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत तपासणी अधिका-याची राहील.
६. कांदाचाळीचे बांधकाम विहीत केलेल्या मापदंडानुसार नसल्यास अनुदानाची तपासणी अधिका-याने शिफारस करु नये. अथवा मोका तपासणी केल्यानंतर त्रृटी असल्यास त्रृटी पुर्ततेबाबत त्वरीत लेखी पत्र शेतक-याला द्यावे व त्याची एक प्रत विभागीय व्यवस्थापक यांना सादर करावी.
७. शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना विचारात घेवून तपासणी अहवाल सादर करावा. तपासणी अहवालात शेतक-यांच्या बँक पासबुकात असलेल्या नावाप्रमाणे नाव व पत्ता अचुक शिफारस पत्रात नमुद करावा. कारण नावात चुक अथवा पत्यात चूक झाल्यास शेतक-याला अनुदान मिळण्यास अडचणी निर्माण होतात.
८. तपासणी अहवाल वस्तुस्थिती दर्शक नसल्यास / चुकीची अनुदानाची शिफारस / प्रत्यक्ष मोजमापे न घेता केलेली शिफारस असे आढळल्यास तपासणी अधिका-यास जबाबदार धरण्याल येईल.
९. विभागीय व्यवस्थापक पणन मंडळ यांनी हे वेळोवेळी बाजार समिती स्तरावर प्राप्त प्रस्तावाचा आढावा घेवून निर्धारीत वेळेत प्रतिनिधी पाठवून तपासणीचे नियोजन करतील.
१०. परीपुर्ण प्रस्ताव बाजार समिती स्तरावरुन विभागीय कार्यालय पणन मंडळ येथे प्राप्त झाल्यानंतर जास्तीत जास्त २० दिवसांच्या आत कांदाचाळीच्या तपासणीचे काम पुर्ण करावे. विभागीय स्तरावरुन त्यानंतर विभागीय व्यवस्थापक हे प्राप्त प्रस्तावाची तपासणी अहवालानुसार छाननी करुन लाभार्थीचे नाव, पत्ता, बांधकामाचा खर्च, देय अनुदान, इत्यादी माहितीसह विभागीय व्यवस्थापकांच्या अभिप्रायासह शिफारस यादी व सोबत एक सदस्यीय समितीचा तपासणी अहवालाच्या मूळ प्रतीसह पणन मंडळ, मुख्यालय पुणे येथे लेखी स्वरुपात अहवाल सादर करतील मूळ प्रस्तावाचे जतन हे पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयात करण्यात येईल. आवश्यकतेनुसार संबंधीत मुळ प्रस्ताव लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करण्यात येईल.
११. विभागीय स्तरावर प्रस्तावाची छाननी करताना पणन मंडळाकडे उपलब्ध असलेल्या कांदाचाळीच्या सन १९९९ पासूनच्या अनुदान यादीत प्राप्त प्रस्तावांचा समावेश नसल्याची खात्री करावी. अनुदान दिलेले असल्यास असे प्रस्ताव कायम स्वरुपी विभागीय व्यवस्थापक यांनी रद्द करावेत.

७) अनुदानाचे वितरण -

विभागीय व्यवस्थापक पणन मंडळ यांच्या स्तरावरुन प्राप्त अहवालाची छाननी पुन्हा मुख्यालयाच्या स्तरावर करण्यात येईल. योजनेचे निकष पुर्ण करणा-या लाभार्थीच्या नावे अनुदान मंजूरीबाबत आदेश काढण्यात येईल. अनुदानाची रक्कम लाभार्थीच्या नावे रजिस्टर पोष्टाने तपासणी अधिका-याने तपासणी अहवाल नमुद केलेल्या नाव व पत्यावर पाठविण्यात येईल. अनुदान मंजुरी आदेशाची एक प्रत संबंधीत बाजार समिती यांना पाठविण्यात येईल.

८) सहकारी संस्थांनी अनुदानासाठी प्रस्ताव दाखल करण्याची पध्दती -

कृषि उत्पन्न बाजार समिती यांनी कांदाचाळीचे बांधकाम चालू करण्यापूर्वी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव संबंधीत विभागीय व्यवस्थापक, पणन मंडळ, विभागीय कार्यालय यांच्याकडे तत्वतः मंजूरीस्तव सादर करावा. तर शंभर मे.टन क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेच्या कांदाचाळी उभारणा-या पात्र सहकारी संस्थांनी पणन मंडळाच्या मुख्यालयाकडे तत्वतः मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करावा. प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे माहिती सादर करावी.

१. कांदाचाळ उभारणी बाबत तत्वतः मंजूरी मिळण्याबाबत अर्ज व सोबत याबाबत संस्थेच्या संचालक मंडळ सभेत पारीत करण्यात आलेल्या ठरावाची प्रत.
२. प्रकल्पासाठी संस्थेच्या नावे जागा असल्याबाबत पुरावा (गाव न.क्र.७, ७अ/१२) अथवा कमीत कमी ३० वर्षे जागा लिजवर घेतल्याबाबतचे कागदपत्रे.
३. प्रस्तावित जागेचा स्थळदर्शक नकाशा.
४. संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र व अद्यावत लेखापरिक्षणाची प्रत.
५. कांदा साठवणूक बांधकामासाठी निधी नियोजनाची माहिती (स्वनिधी अथवा बँक कर्ज.)
६. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्या भागातील कांदा साठवणुकीची निकड लक्षात घेता संबंधीत बाजार समितीला पणन मंडळाचे विभागीय व्यवस्थापक हे स्वतः तत्वतः मंजूरी प्रदान करतील तर बाजार समिती व्यतिरीक्त इतर सहकारी संस्थांना मुख्यालयामार्फत तत्वतः मंजूरी देण्यात येईल.
७. बाजार समिती / सहकारी संस्था यांना पणन मंडळाकडून तत्वतः मंजूरी प्राप्त झाल्यानंतर विहीत आराखड्याप्रमाणे संस्थेने प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करावे.
८. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वैयक्तिक लाभार्थींनी कांदाचाळ अनुदानासाठी सादर करावयाच्या प्रस्तावाप्रमाणेच अनुषंगिक बिले व इतर कागदपत्रासह प्रस्ताव पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयात सादर करावा. फक्त हमी पत्रामध्ये संस्थेच्या सभासदांच्या कांदा साठवणुकीसाठी हा प्रकल्प उभारण्यात येत असून त्याचा वापर हा कांदा साठवणुकीसाठी करण्यात येईल याबाबत हमी पत्रात उल्लेख करावा.

९) सहकारी संस्था व बाजार समिती कांदाचाळ प्रकल्पाची तपासणी व अनुदान शिफारस करणे

बाजार समिती व सहकारी संस्था यांनी विहीत आराखड्याप्रमाणे उभारणी केलेले कांदाचाळ प्रकल्पाची तपासणी ही संबंधीत विभागीय व्यवस्थापक, विभागीय कार्यालय व व्यवस्थापक (प्रकल्प), मुख्यालय ही द्विसदस्यीय समिती करतील. समितीने अनुदानाची शिफारस केलेली असल्यास विभागीय व्यवस्थापक हे अभिप्रायासह तपासणी अहवाल मुख्यालयाकडे अनुदानासाठी प्रस्तावित करतील. मुख्यालयामार्फत याबाबतचा मंजूरी आदेश काढून लाभार्थीला धनादेश रजिस्टर पोष्टाने पाठविण्यात येईल.

१०) जिल्हा व तालुका स्तरावर योजनेचे सनियंत्रन व अंमलबजावणी

शासनाने ठरवुन दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार योजनेची अंमलबजावणी, सनियंत्रण, जिल्हा निहाय लक्षांकाची प्रतीपुर्ती वेळेत करणे, बाजार समितींना लक्षांक देउन त्याबाबतचा वेळोवेळी आढावा घेणे, मार्गदर्शन करणे व योजनेची अंमलबजावणी करणे यासाठी शासनाचे नियंत्रक म्हणुन तालुका स्तरावर संबंधीत तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था व जिल्हा स्तरावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हे कामकाज पाहतील. याबाबतचा वेळोवेळी अहवाल शासनास व पणन मंडळास सादर करतील.

११) वाद निर्मुलन समिती -

शेतक-यांनी उभारलेल्या कांदाचाळी व अनुदान योजना या बाबत वाद उद्भवल्यास त्याचा निपटारा करण्यासाठी तालुका स्तरावर संबंधित सहायक निबंधक,सहकारी संस्था यांच्या स्तरावर वाद निर्मुलन समिती स्थापन करण्यात येत आहे. या समितीकडे शेतकरी दाद मागू शकतात या समितीची संरचना खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| सहायक निबंधक,सहकारी संस्था | - अध्यक्ष |
| कांदाचाळ तपासणी अधिकारी (पणन मंडळ) | - सदस्य |
| सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती | - सदस्य |

ही समिती बहुमताने आपला निर्णय तक्रारकर्त्यास देईल. जर तालुका स्तरीय समितीने दिलेला निर्णय हा तक्रारकर्त्यास अमान्य असल्यास संबंधीत तक्रारकर्ता जिल्हा समितीकडे दाद मागू शकतो. जिल्हा समितीची संरचना खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | - अध्यक्ष |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - सदस्य |
| विभागिय व्यवस्थापक / प्राधिकृत अधिकारी पणन मंडळ | - सदस्य |

या समितीने बहुमताने तक्रार कर्त्यास दिलेला निर्णय अंतिम असुन तो संबंधीताना बंधनकारक राहील. त्यानंतर संबंधीत तक्रारकर्त्याची तक्रार दफ्तरी दाखल करण्यात येईल.

१२) कांदाचाळी उभारणी करताना घ्यावयाची काळजी -

सुधारीत पद्धतीनुसार कांदाचाळी मधील कांद्याला सर्व बाजुंनी हवा खेळती राहील या दुष्टीने आराखडे तयार करण्यात आलेले आहेत. अनुदानास पात्र कांदाचाळींची उभारणी करताना खालील बाबींची दक्षता घेणे आवश्यक आहे.

१) जमिनीच्या प्रकारानुसार आवश्यक तेवढा पाया खोदुन आराखड्यामध्ये दर्शविल्यानुसार पायासाठी सिमेंट कॉंक्रिटचे पिलर / कॉलम उभारणे आवश्यक आहे.

२) कांदा साठवणुकीची जागा जमिनीपासुन दिड ते दोन फुट उंच असणे आवश्यक आहे. तथापी, ज्या भागात अती आद्रता असते अशा भागात खालील बाजुस हवा खेळती राहण्यासाठी मोकळी जागा सोडणे बंधनकारक असणार नाही. परंतु उष्ण हवामानाच्या जिल्ह्यामध्ये खालील बाजुस मोकळी हवा खेळती राहील, या दृष्टीने कांदा चाळीची उभारणी करावी.

३) पिलर / कॉलम वरती लोखंडी अँगल किंवा लाकडी खांबाद्वारे चाळीची संपुर्ण सांगाडा तयार करावा.

४) एक पाखी कांदा चाळीची उभारणी दक्षिण - उत्तर तर दुपाखी कांदाचाळीची उभारणी पुर्व - पश्चिम करावी. कांदा चाळीच्या छपरासाठी सिमेंटचे पत्रे अथवा मंगलेरु कवेलु यांचा वापर करावा. बाजुच्या भिंती व तळ यासाठी बांबु अथवा तत्सम लाकडी पट्ट्या किंवा लोखंडी जाळी यांचा वापर करावा. तर पाया आरसीसी खांब/स्तंब उभारुन करावा. कांदाचाळीला टिन पत्र्याचा वापर केलेला असल्यास पत्र्याला आतील बाजुस पांढ-या रंगाचा ऑईल पेंट द्यावा.

५) २५ मे.टन चाळीसाठी लांबी १२ मीटर, रुंदी ३.९ मीटर (१.२ मीटर + १.५ मीटर + १.२ मीटर), बाजुची उंची २.४ मीटर व मधली उंची ३.३५ मीटर , दोन ओळीतील मोकळ्या जागेची रुदी १.५ मीटर अशा रीतीने कांदाचाळीचे बांधकाम करताना मोजमापे घ्यावीत. चाळीच्या एका कप्याची आतील रुंदी ही १.२ मीटर असावी. ५० मे.टन क्षमतेच्या चाळीसाठी लांबीचे प्रमाण दुप्पट करावे रुंदी व उंचीचे प्रमाण हे २५ मे.टन प्रमाणे कायम राहील.

६) कांद्याची साठवणुक ही फक्त ५ फुट उंची पर्यंत करावी.

७) चाळीच्या छतास पुरेसा उतार द्यावा. कांदाचाळीच्या छतासाठी वापरण्यात आलेले पत्रे हे बांधकामापेक्षा १ मीटर बाहेर असावेत.

८) कांदाचाळीचे छत हे शक्यतो उष्णता प्रतीबंधक वस्तुंनी आच्छादीत करावेत.

९) कांदा चाळीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर कांदाचाळीच्या तपासणी पुर्वी दर्शनी भागास ३ x २ फुट आकारमानाचा कायम स्वरुपी नामफलक लावावा. नामफलकावर शेतक-याचे नाव, बांधकाम वर्ष व कांदाचाळ क्षमता नमुद करावी.

१०) सर्व क्षमतेचे निर्धारीत कांदाचाळीचे आराखडे शेतक-यांना अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आराखड्यात दिलेली आकारमाने व नमूद साहित्याप्रमाणे कांदाचाळीचे बांधकाम अनुदानासाठी पात्र चाळींना करणे बंधनकारक आहे.

सदर प्रकल्पाच्या अधिक माहीतीसाठी महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे मुख्यालय पुणे, विभागीय कार्यालय किंवा स्थानिक कृषि उत्पन्न बाजार समितीशी संपर्क साधावा.

------------------